पुढारी



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात योग शिबिर पार पडले. (छाया : पप्पू अत्तार)

# योगासनामुळे सकारात्मक ऊर्जानिर्मिती

## डॉ. पाटील : शिवाजी विद्यापीठात योग शिबिर



शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

योगसाधनेच्या सहाय्याने प्रत्येक व्यक्तीला सकारात्मक ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष योगसाधना शिबिराने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठात संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेनुसार २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरातील १७५ देशांमध्ये या निमित्ताने योगसाधना केली जाते. गेली नऊ वर्षे सलग दैनंदिन स्वरूपात विद्यापीठात मोफत योग शिबिर घेतले जात आहे. या उपक्रमाचा दैनंदिन २०० हून अधिक साधक लाभ घेतात. हा उपक्रम या पुढेही सुरू राहील, त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा आणि आपले आरोग्य जपावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिबिरात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले सहभागी झाले.

विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनीही या योगसाधना शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी झाले. उचगावचे योगशिक्षक सूरज पाटील यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले.

2 3 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्यपूर्ण शिक्षणाने दोन लाख विद्यार्थी स्वावलंबी

## शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य उद्योजकता विकास केंद्राच्या उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमधील कौशल्ये वाढीस लागावीत. या कौशल्यांचा लाभ त्यांना नोकरी-व्यवसायांमध्ये व्हावा, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठातर्फे कौशल्य उद्योजकता विकास केंद्रातर्फे विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. या केंद्राची स्थापना झाल्यापासून तब्बल २ लाख ४ हजार ९६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून, अभ्यासक्रमांच्या जोरावर स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत.

शिवाजी विद्यापीठात २०१७ मध्ये कौशल्य उद्योजकता विकास केंद्राची स्थापना करण्यात आली.



विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षण देण्याबरोबर, त्यांच्या भावी आयुष्यात नोकरी-व्यवसायासाठी उपयुक्त असे अभ्यासक्रम येथे शिकवण्यात येतात. केंद्रातर्फे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी तब्बल २०० प्राध्यापक तीनही जिल्ह्यांत कार्यरत आहेत.

व्यवसायाबरोबरच विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध व्हावी यासाठी केंद्रातर्फे रोजगार मेळावे घेण्यात येतात. केंद्राच्या पहिल्या वर्षी ५१ हजार ७५०, दुसऱ्या वर्षी २३ हजार ७६९, तिसऱ्या वर्षी ५० हजार ४११, चौथ्या वर्षी ३ हजार ४५० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले, तर कोरोना काळात ऑनलाईन प्रशिक्षणाची सोय केंद्रातर्फे उपलब्ध करून दिली होती.

### या अभ्यासक्रमांकडे कल

या केंद्राकडे १ तास ते १ वर्ष अशा कालावधीचे तब्बल ५४ विविध कोर्सेस आहेत. त्यापैकी इव्हेंट मॅनेजमेंट, बेसिक इंग्लिश ग्रामर, मोडी लिपी, सूत्रसंचालन व निवेदन, बेसिक कोर्स इन योगा, रोपवाटिका व उद्यान कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल दिसून येतो.

### कौशल्य वाढवणारे अभ्यासक्रम

विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढीस लागावी यादृष्टीने अभ्यासक्रम आहेत. येत्या काळात विद्यार्थ्यांना सहजपणे नोकरी-व्यवसाय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. येत्या काळात स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवणारे हे अभ्यासक्रम आहेत.

– डॉ. रामचंद्र पवार

23 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संस्कृत, पाली अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू होणार

## प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र विभागांना मिळणार स्वायत्तता

### व्यवस्थापन परिषद बैठक

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळाची आज बैठक झाली. त्यामध्ये विविध ७५ विषयांवर चर्चा झाली. त्यात विद्यापीठात संस्कृत, पाली अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र या अधिविभागांना स्वायत्तता देण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना, बांधकाम समितीचे कामकाज, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पीएच.डी.चे नवीन रेगुलेशन्स, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन, प्रकल्पावरील संशोधन सहायकांना रजा देणे, वृक्ष लागवड करणे, तासिका तत्त्वावर प्राध्यापकांचे मानधन, तसेच विद्यापरिषदेकडे आलेल्या शिफारशींवर चर्चा करण्यात आली.

विद्यापीठ कॅम्पस ले-आउट तयार करणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार थकबाकी अदा करणे, स्कूल ऑफ फाईन आर्टस्‌ची स्थापना करण्याबाबत चर्चा झाली. विविध समित्यांचे नामनिर्देशन, हंगामी शिक्षकांची सुमारे २०० पदे भरणे, संत तुकाराम गाथेचे निरुपण या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन आदी विषय मंजूर करण्यात आले.

2 3 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची बी.ए.,बी. कॉम.,एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी आज दिली.

प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे

## चार पदवी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

■ विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज चार पदवी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. त्यात बी. ए. ड्रेस मेकिंग, बीएफटीएम अभ्यासक्रमाच्या पाचव्या आणि सहाव्या सत्राचा समावेश आहे. विविध २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. त्यासाठी ४३०७ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षा कालावधीत भरारी पथकाने सांगली जिल्ह्यात कॉपी करताना दोन विद्यार्थ्यांना पकडले.



विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्यांतील कर्मचारी आदींना प्रवेशित होता येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या (www.unishivaji.ac.in) या संकेतस्थळावर (Distance Education) या लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध आहे. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित होणार आहेत, अशा विद्यार्थ्यांनाही दूरशिक्षण अभ्यासक्रमांना प्रवेशित होता येणार आहे. त्यामुळे दुहेरी पदवीचाही लाभ मिळणार आहे; त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे. माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक प्रा. मोरे यांनी केले.

पुढारी

MISSION ADMISSION

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरू झाल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या www. unishivaji. ac. in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध आहे. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित होणार आहेत, अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येणार असून, दुहेरी पदवीचा लाभ मिळणार आहे.

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. कोर्स वर्क परीक्षेसंदर्भात अधिविभागांना सूचना

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा वर्षातून दोनवेळा घेतली जाते. कोर्सवर्क पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये २३ जून ते ३ जुलैपर्यंत विनाविलंब शुल्कासहं १ हजार १६५ रूपये भरून अर्ज भरावयाचा आहे. तसेच एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षेला २४ जुलैपासून प्रारंभ होणार आहे. तरी अधिविभागांनी यासंदर्भातील माहिती पात्र विद्यार्थ्यांना देवून अर्ज भरून घ्यावयाचा आहे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेसाठी ५ ते ७ जुलै या कालावधीत विलंब शुल्कासह १ हजार १६५ अधिक दिलेल्या मुदतीत प्रतिदिन ५० रूपये भरावयाचे आहेत. तसेच अतिविलंब शुल्कासह ९ ते १२ जुलै या कालावधीत १ हजार १६५ अधिक दिलेल्या मुदतीत प्रतिदिन ५० अधिक ३०० रूपये भरावयाचे आहेत. एम. फिल., पीएच. डी. संदर्भातील शाखानिहाय जुने कोर्सवर्क आणि नवीन कोर्सवर्कचे कोडनंबर प्रसिध्द केले आहेत.

सकाळ

# अजीवन अध्ययन व विस्तार विभाग

शिवाजी विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे डॉ. सुमन बुवा, वीणा मालडीकर, प्रीती चव्हाण यांनी आयोजन केले. डॉ. रामचंद्र पवार, उदय घाटे, मलिक गोवावाला, योग शिक्षक, साधक उपस्थित होते. योग शिक्षक रोहित चव्हाण यांचे योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. परिचय परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण केले.

जनसंपर्क कक्ष
2 3 JUN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकास असणाऱ्यांनाच भविष्यात रोजगाराच्या संधी : डॉ. पडवळ

## विद्यापीठात विशेष ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिकीकरणाच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे भारतात परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आल्यामुळे स्पर्धा वाढली आहे. कौशल्य विकास असणाऱ्यांनाच भविष्यात रोजगाराच्या संधी आहेत. असा विद्यार्थीच स्पर्धेच्या जगात टिकू शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. प्रा. आर. डी. पडवळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विभागीय केंद्र, सांगली, मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली, कन्या महाविद्यालय मिरज व राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

डॉ. पडवळ म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कौशल्य कष्ट करण्याची तयारी त्याला लागणारे शिक्षण व संवाद कला महत्त्वाची आहे. कौशल्य विकास असणाऱ्या विद्यार्थ्यांनी रोजगाराच्या बाबतीत सजग असले पाहिजे. त्यासाठी सकारात्मक मानसिकता असणे आवश्यक आहे.

कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. मानसी गानू, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, डॉ. के. बी. पाटील, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. व्ही. बी. चौगुले यांनी केले. डॉ. जी. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

लोकमत

# ४३०७ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून गुरुवारी एम.एस्सी., एम.ए. यासह २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. ४३०७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेवेळी सांगली जिल्ह्यात दोन गैरप्रकार आढळून आले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ४ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेला गुरुवारी ४ हजार ३०७ विद्यार्थी उपस्थित होते. मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ जर्नालिझम, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर आर्टस् इन वुमेन स्टडीज, मास्टर ऑफ आर्टस् (होम सायन्स) आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न सुरळीतपणे पार पडल्या. बी.ए. (ड्रेस मेकिंग) बीएफटीएम, बी.ए. आदी चार अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले. सांगली जिल्ह्यातून दोन गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत; चार विषयांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मार्च–एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेला गुरुवारी ४ हजार ३०७ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत गुरुवारी मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ जर्नालिझम, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर आटर्स इन वुमेन स्टडीज, मास्टर ऑफ आटर्स (होम सायन्स) आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने सुरळीतपणे पार पडल्या आहेत. दरम्यान, बीए (ड्रेस मेकींग) बीएफटीएम, बीए आदी चार अभ्यासक्रमांचे निकाल गुरुवारी जाहीर केले आहेत. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातील दोन गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष

23 JUN 2023

पुण्यनगरी


शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराजमध्ये मायक्रोबायोलॉजी, गणित अभ्यासक्रम सुरू

## बीसीए, बीसीएस, बीकॉमच्या अकरा नवीन तुकड्यांना मंजुरी

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथील कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था संचालित शिवराज महाविद्यालयामध्ये ११ नवीन तुकड्या सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. यामध्ये बी. कॉम. (गणित), एम.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी) असे दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्याचबरोबर बी.सी.ए., बी.सी.एस., बी. कॉम. इंग्रजी माध्यम अशा ११ नवीन तुकड्यांना एकाचवेळी परवानगी मिळालेले शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील शिवराज महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. या भागातील विद्यार्थ्यांची गरज



ओळखून महाविद्यालयात या नवीन तुकड्यांना मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे.

सध्या या विद्या संकुलामध्ये के.जी. टू पी.जी. असे शंभरहून अधिक वर्ग सुरू असून, त्यामध्ये आठ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरवर्षी या संख्येमध्ये भर पडत चाललेली आहे. त्यामुळे या संस्थेची स्वायत्त विद्यापीठाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात होत आहे. सीमाभागातील शिक्षण सेवकांनी ५० वर्षांपूर्वी एकत्र येऊन चालवलेल्या या महाविद्यालयामध्ये अनेक नवनवीन उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहेत. याची दाखल घेऊन राष्ट्रीय पातळीवर नुकत्याच झालेल्या तपासणीमध्ये या महाविद्यालयाला ए ग्रेड मानांकन मिळाले आहे. या शिक्षण संस्थेमुळे महाराष्ट्र व कर्नाटकातील सीमाभागातील लाखो विद्यार्थ्यांनी आतापर्यंत पदव्या प्राप्त केलेल्या असून, हजारो विद्यार्थ्यांनी परदेशातही नोकऱ्या मिळवलेल्या आहेत. अडीचशेहून अधिक संख्येने असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यासाठी सतत कार्यरत आहेत. एकेकाळी या महाविद्यालयामध्ये शिक्षण सेवक असलेले शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष प्रा. जे. वाय. बारदेस्कर यांच्यासह शिक्षण सेवकांनी ध्येयवादाने प्रेरित होऊन आपले कर्तव्य बजावलेले आहे. त्यामुळेच या महाविद्यालयाची घोडदौड प्रगतीच्या दिशेने चाललेली असल्याची माहिती सचिव कुराडे यांनी दिली.